# अलगुडेवाडीत आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना कपडे, खाऊवाटप

## तनिष्का व जॅक्सन इन हॉटेलतर्फे उपक्रम

**फलटण शहर, ता. ३१ :** सकाळ तनिष्का व्यासपीठ व जॅक्सन इन हॉटेलच्या संयुक्त विद्यमाने आश्रमशाळेतील मुलांना कपडे, खेळणी व खाऊवाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. घरापासून दूर असलेल्या मुलांचे जीवन आनंदमयी बनविण्यासाठी त्यांच्याशी जवळीक निर्माण करून त्यांचे हट्ट पुरविल्याने मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल, असे मत 'जॅक्सन इन'चे व्यवस्थापक गौतम बॅनर्जी यांनी व्यक्त केले.

अलगुडेवाडी (ता. फलटण) येथील आश्रमशाळेत नाताळनिमित्त हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी तनिष्का समन्वयक प्रतिभा कदम, संस्थेचे उपाध्यक्ष राहुल नाळे, संचालक संतोष नाळे, तनिष्का सदस्या मंगल जाधव, व्यवस्थापक विभागाचे कुणाल इंदोरकर, फायनान्स विभागाचे संदीप जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी सांताक्लॉजच्या वेशात आश्रमशाळेतील मुलांना खेळणी व खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना मिष्टांनाचे जेवण देण्यात आले. मुख्याध्यापक विजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.



**अलगुडेवाडी (ता. फलटण) : मुलांना नवीन कपड्यांचे वाटप करताना गौतम बॅनर्जी व प्रतिभा कदम. त्या वेळी इतर.**

**(संदीप कदम : सकाळ छायाचित्रसेवा)**